Email - Info@maharashtracrimetimes.com

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

संपादकः- राकेश शंकर गोरे

प्रकाशन - मुंबई, एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, पुणे, सातारा, रत्नागिरी

R.N.I. No. MAHMAR/2010/33301

● वर्ष : ९ ● अंक: ३४ ● पृष्ठ: ४ ● मुंबई, मंगळवार २० नोव्हेंबर २०१८ ते सोमवार २६ नोव्हेंबर २०१८

मूल्य २/- रुपये

Website:maharashatracrimetimes.com Email-maharashtracrimetimes33301@gmail.com POSTAL REGISTRATION NO. MCN/157/2017-2019

३ | मुंबईतील ४७ स्थानकांची सुरक्षा वाढवणार

'काँग्रेस संस्कृतीमुळे देशाचं नुकसान' | ४

# मराठा आरक्षणासाठी स्वतंत्र कोटा




**मुंबई (विशाल कारंडे) -मूळ आरक्षणाला धक्का न लावता तमिळनाडूच्या धर्तीवर सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग एसईबीसी अंतर्गत राज्यातील मराठा समाजाला स्वतंत्रपणे आरक्षण देण्याच्या निर्णयाला राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मराठा समाजाला आरक्षण देण्यासंदर्भातील वैधानिक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमितीची नियुक्ती करण्यात आली असून, हिवाळी अधिवेशनादरम्यान मराठा आरक्षणाची घोषणा केली जाईल, असेही त्यांनी या वेळी स्पष्ट केले. हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. येथील सह्याद्री राज्य अतिथिगृहात ही पत्रकार परिषद पार पडली.**

मुख्यमंत्री म्हणाले, की राज्य मागासवर्ग आयोगाचा अहवाल राज्य शासनाला प्राप्त झाला आहे. या अहवालात तीन महत्त्वपूर्ण शिफारशी आहेत. यात मराठा समाजाला सामाजिक व शैक्षणिक मागास घोषित करण्यात आले आहे. मराठा समाज आरक्षणाचे फायदे घेण्यास पात्र असल्याचे आयोगाने शिफारशीत म्हटले आहे. तसेच, मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत राज्य शासन आवश्यक निर्णय घेऊ शकेल, असेही आयोगाने शिफारशीत म्हटले आहे. त्यास अनुसरून राज्य मंत्रिमंडळाने आयोगाच्या या तिन्ही शिफारशी स्वीकारल्या आहेत. मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग (सोशल अँड इकॉनॉमी बॅकवर्ड क्लास) स्थापन करून त्याअंतर्गत मराठा समाजाला स्वतंत्रपणे आरक्षण दिले जाईल. एसईबीसीच्या अंतर्गत आरक्षण देण्यास राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. आरक्षणाची पुढील वैधानिक कारवाई करण्यासाठी मंत्रिमंडळाची उपसमिती स्थापन करण्यात आली आहे. चालू अधिवेशनातच आरक्षणाची घोषणा केली जाणार आहे. मराठा आरक्षणासाठी केंद्रीय मागासवर्ग आयोगाच्या परवानगीची गरज नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कर्जमाफीबाबत बोलताना ते म्हणाले, की योजनेतून आतापर्यंत ५० लाख शेतकऱ्यांना लाभ दिला आहे. योजनेत सुरुवातीला घोळ झाला होता. पण, नंतर अंमलबजावणी नीट सुरू केली. विरोधकांच्या काळात जी कर्जमाफी झाली त्याची यादीसुद्धा उपलब्ध नाही. मात्र, आमच्या कर्जमाफीतील सगळ्या शेतकऱ्यांची यादी आमच्याजवळ आहे. विरोधकांकडून फक्त राजकारण केले जात आहे, अशी टीका त्यांनी केली. ते पुढे म्हणाले, की बोंडअळीग्रस्त ३५ लाख शेतकऱ्यांच्या खात्यावर मदतीपोटी २,२५८ कोटी रुपये मदत वितरित केली आहे. आजपर्यंत इतक्या वेगाने अशी मदत कधीच मिळाली नव्हती. राज्य शासनाने मोठ्या प्रमाणावर शेतमाल खरेदी केला आहे.

## ओबीसी संघटनेचा मराठा आरक्षणाला विरोध

**मुंबई (हर्षद परब)-** मराठा आरक्षणाचा मार्ग मोकळा होत असतानाच या आरक्षणाला आता ओबीसी फेडरेशनने विरोध केला आहे. तसेच मराठा समाजाच्या




स्थितीचे सर्वेक्षण करण्यासाठी नेमण्यात आलेल्या मागासवर्ग आयोगावरही ओबीसी संघटनांनी शंका व्यक्त केली आहे. मराठा आणि ब्राह्मण समाजाशी संबंधित मराठा आरक्षणासाठी सर्व्हे करणाऱ्या या संस्था असल्याचा दावा ओबीसी फेडरेशनने केला आहे. याद्वारे अप्रत्यक्षपणे त्यांनी मागासवर्ग आयोगाच्या निष्पक्षपणावरच आक्षेप घेतला आहे. मराठा आरक्षण एसईबीसी सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्ग अंतर्गत देण्यास आमचा विरोध असल्याची भूमिका ओबीसी फेडरेशनने घेतली आहे. विशेष प्रवर्गातून मराठा समाजाला आरक्षण देण्यास या संघटनांचा विरोध आहे.

सरकारने मराठा समाजाला आरक्षण बहाल करण्याआधी जाती-निहाय जनगणना करावी, अशी मागणीही ओबीसी संघटनांनी केली आहे. ओबीसी फेडरेशनचे नेते न्यायालयात मराठा आरक्षणाला आव्हान देण्याच्या तयारीत आहेत. मुख्यमंत्र्यांपर्यंत आम्ही आमचे सर्व आक्षेप पत्र लिहून पोहोचवणार आहोत, अशी माहिती ओबीसी फेडरेशनच्या नेत्यांनी दिली आहे.

## लोकसभा-विधानसभेच्या सर्व जागा लढवणार 'महाराष्ट्र क्रांती सेना'

**कोल्हापूर (संदेश पाटील)-** नव्या महाराष्ट्र क्रांती सेना या राजकीय पक्षाची आरक्षणासाठी राज्यभर भव्य मोर्चे काढणाऱ्या मराठा क्रांती मोर्चाचे निमंत्रक सुरेश पाटील यांनी स्थापना केली. हा पक्ष आता आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणूक लढवणार असल्याची घोषणा कोल्हापूर येथे सोमवारी करण्यात आली. यंदाच्या दिवाळीत रायरेश्वर येथे महाराष्ट्र क्रांती सेनेची स्थापना करण्यात आली. आगामी निवडणुकीत या पक्षाकडून राज्यातील लोकसभेच्या ४८ आणि विधानसभेच्या २८८ जागा लढवण्यात येणार असल्याची अधिकृत घोषणा सोमवारी कोल्हापूरात करण्यात आली. दरम्यान, जर राष्ट्रवादी काँग्रेसकडून साताऱ्याचे खासदार उदयनराजे भोसले हे निवडणूक लढवणार नसतील तर महाराष्ट्र क्रांती सेनेकडून लढवतील अशी



अपेक्षा आणि विश्वास पक्षाच्या पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आली. मराठा समाजाचाच मराठा क्रांती मोर्चातून निर्माण झालेल्या 'महाराष्ट्र क्रांती सेना' या पक्षाला विरोध असून मागण्या मान्य करून घेण्यासाठी समाज सक्षम आहे. कोणत्याही राजकीय पक्षाच्या यासाठी स्थापनेची गरज नाही. समाजाच्या आंदोलनाला राजकीय पक्ष स्थापून वेगळी दिशा देण्याचा कोणताही प्रयत्न यशस्वी होऊ दिला जाणार नाही.

## अरबी समुद्रात कमी दाबाच्या पट्ट्यामुळे राज्यात अनेक भागात ही पावसाची जोरदार हजेरी



**रत्नागिरी (योगेश होळंब)- अरबी समूद्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने ही पावसाची स्थिती निर्माण झाल्याचे हवामान खात्याकडून सांगण्यात येत आहे. राज्यातील अनेक भागात काल रात्री आणि आज सकाळपासून जोरदार पावसाने हजेरी लावली आहे. अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने ही पावसाची स्थिती निर्माण झाल्याचे हवामान खात्याकडून सांगण्यात येत आहे.**

मात्र, या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. यामुळे पिकांचे नुकसान होण्याचा धोका वर्तवण्यात येत आहे.

कोकणासह, पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये पावसाने हजेरली लावली आहे. यामध्ये सोलापूर, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांचा समावेश आहे. सांगली जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये वीजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाने हजेरी लावली. खानापूर, आटपाडी तालुक्यांत रात्री जोरदार पाऊस झाला. त्याचबरोबर पंढरपूरातही जोरदार पावसाने हजेरी लावल्याने कार्तिकी सोहळ्यानिमित्त आलेल्या वारकऱ्यांची तारांबळ उडाली. कोल्हापूर जिल्ह्यातील काही भागात पावसाने हजेरी लावली. शिरोळमधील गणेशवाडीसह सीमाभागात भागात जोरदार पाऊस बरसला.

रविवारी रात्री उशीरा दुष्काळी भागात पावसाने दमदार हजेरी लावल्याने पाण्याचा प्रश्न काही अंशी सुटण्याची शक्यता आहे. मात्र, या अवकाळी पावसामुळे पिकांचे नुकसान होण्याची शक्यताही वर्तवली जात आहे. दरम्यान, कोकणातही जोरदार पाऊस झाला असून सिंधुदूर्गात ढगांच्या गडगडाटांसह मुसळधार पावसाने हजेरी लावली. मालवण, कुडाळ, वेंगुर्ले, कणकवलीत या भागात पावसाच्या जोरदार सरी कोसळल्या. अरबी समुद्रात कमी दाबाच्या पट्यामुळे राज्यात अनेक भागात ही पावसाची स्थिती पहायला मिळली.

## अमृतसर बॉम्ब हल्ल्याचे पाकिस्तान कनेक्शन

**चंदीगढ (सुनील आढाव)-** अमृतसरमधील निरंकारी भवनावर झालेल्या ग्रेनेड बॉम्ब हल्ल्याचे कनेक्शन पाकिस्तानशी असल्याचं समोर येत आहे. हल्ल्यात वापरलेला ग्रेनेड हे HE-३६ सीरिजचे आहेत. या प्रकारचे ग्रेनेड पाकिस्तानी लष्कर वापरतं, अशी माहिती तपासात उघड झाली आहे. या हल्ल्यात तीन जणांचा मृत्यू झाला होता, तर काही जण जखमी झाले होते. हल्ला पाकिस्तानातून घडवून आणल्याचं तपासात समोर आलं आहे. या हल्ल्यामागे नव्या दहशतवादी संघटनेचा हात असल्याचं बोललं जात आहे. या हल्ल्यानंतर गृहमंत्रालयात महत्वाची बैठक पार पडली आहे, रॉ, आयबीसह



गृहमंत्रालयातील काही वरिष्ठ अधिकारी याबैठकीला उपस्थित होते.

या प्रकरणानंतर पंजाब आणि जम्मू-काश्मीरच्या सीमेवर हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. एनआयएची ३ सदस्यीय समितीने घटनास्थळी जाऊन तपासणी केली. तर हल्लेखोरांबद्दल माहिती देणाऱ्यास ५० लाख रुपये बक्षीसाची घोषणाही पंजाब सरकारने केली आहे. काही दिवसापूर्वी पंजाबमध्ये जैश-ए-मोहम्मद संघटनेचे दहशतवादी घुसल्याची आणि अल-कायदा कमांडर जाकिर मुसाच्या हालचालींची माहिती मिळाली होती.

## अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सरकारवर दिलगिरी व्यक्त करण्याची वेळ

**मुंबई (विश्वास सुतार)-** विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राज्य सरकरवर दिलगिरी व्यक्त करण्याची वेळ आली. विधानपरिषदेचे पहिले विरोधी पक्षनेते कॉम्रेड माधवराव गायकवाड यांच्या निधनावर सरकारने दाखवलेल्या उदासिनतेबाबत महसूल मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिलगिरी व्यक्त केली. 'कॉ. माधवराव गायकवाड यांच्या निधनानंतर तब्बल ३० तास सरकारने त्यांच्या कुटुंबाशी कोणताही संपर्क केला नाही. शिवाय ३० तासांनंतर सरकारने संपर्क करुन आणखी दोन तास थांबा, असं उत्तर कुटुंबीयांना दिलं. त्यावर सरकारने दिलगिरी व्यक्त करावी आणि संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करावं,' अशी मागणी विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे यांनी केली होती.

यानंतर चंद्रकांत पाटील यांनी संपूर्ण घटनेबाबत खेद व्यक्त केला. 'कॉम्रेड माधवराव गायकवाड यांच्या अत्यंसंस्काराबाबत नेमकं काय झालं, याची माहिती घेत आहोत. या सर्व घटनेची दिलगिरी व्यक्त करुन, नेमकं काय झालं हे संध्याकाळपर्यंत कळेल, असं चंद्रकांत पाटील यांनी सांगितलं. नाशिकच्या मनमाडमधील भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी आमदार कॉम्रेड माधवराव गायकवाड यांचं १२ नोव्हेंबर रोजी सकाळी निधन झालं.

## अधिवेशनात गाजणार मुंबईतील प्रश्न



**मुंबई (विजय पंचवाघ)-** विधिमंडळाच्या अधिवेशनात राज्यातील दुष्काळावरून रान उठणार असून मुंबईतील पाणीटंचाईसह वाहतूक कोंडी, तसेच नागरी प्रश्नही गाजण्याची शक्यता आहे. मुंबईत मेट्रोचे काम महत्त्वाच्या रस्त्यांवर सुरू आहे. या कामांमुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण झाला आहे. ठिकठिकाणी वाहतूक कोंडी होत असून त्यामुळे मुंबईचा वेग मंदावला आहे. या प्रश्नावरून विरोधक सत्ताधाऱ्यांना लक्ष्य करण्याची शक्यता आहे. डिलाईल रोड पूल बंद केल्यामुळे दक्षिण मुंबईतील वाहतुकीचा बोजवारा उडाला आहे. मुंबईतील शंभर वर्षांपूर्वीचे पूल पाडून त्यांची पुनर्बांधणी करण्यात येणार आहे. मात्र या कामांनाही वेग नाही. त्यामुळे रेंगाळेल्या पुलांच्या पुनर्बांधणीचा प्रश्न ऐरणीवर येण्याची शक्यता आहे. पुलांची दुरुस्ती आणि पुनर्बांधणी याबाबत मोठे अडथळे निर्माण होत आहे. पुलांचा विषय चर्चेला येण्याची शक्यता आहे.

मुंबई महापालिकेत नगरसेवक राहिलेल्या काही आमदारांना मुंबईच्या प्रश्नांची जाण आहे. मुंबईतील आमदारही अनेक शहरांतील विविध प्रश्नांवर काम करीत आहेत. त्यामुळे ते विधिमंडळाच्या अधिवेशनात मुंबईचे प्रश्न मांडण्याची



शक्यता आहे. मुंबईत दहा टक्के पाणीकपात झाल्यानंतर शहर आणि उपनगरांत पाणीटंचाईचे संकट निर्माण झाले आहे. पाणीटंचाईचा प्रश्न, मुंबईत निर्माण होणाऱ्या सात हजार मेट्रिक टन कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी निर्माण झालेल्या डम्पिंग ग्राऊंडचा प्रश्न, मेट्रोच्या कामांमुळे होणारी वाहतूक कोंडी, रस्त्यातील खड्डे, गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न, शासकीय रुग्णालयांमध्ये वैद्यकीय सुविधांची कमतरता आदी प्रश्न अधिवेशनात चर्चेला येण्याची शक्यता आहे.

## सौजन्य व्हॉट्सअप




## दुष्काळी शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार द्या

**मुंबई (अमोल गुडेकर)-** राज्य सरकारने दुष्काळी शेतकऱ्यांना तातडीने दिलासा द्यावा, अशी मागणी करून शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये आणि फळबागायतदारांना हेक्टरी एक लाख रुपयांची मदत जाहीर केल्याशिवाय हिवाळी अधिवेशनाचे कामकाज चालू देणार नाही, असा इशारा विरोधी पक्षनेते राधाकृष्ण विखे पाटील आणि धनंजय मुंडे यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत दिला. तसेच, राज्य शासनाच्या निषेधार्थ चहापानावर बहिष्कार टाकल्याची घोषणाही त्यांनी केली. हिवाळी अधिवेशनात सरकारविरोधी रणनीती ठरवण्यासाठी सर्व विरोधी पक्षाच्या नेत्यांची विखे यांच्या शासकीय निवासस्थानी बैठक पार पडली. त्या बैठकीनंतर पत्रकार परिषद घेण्यात आली. विखे-पाटील म्हणाले, की चालू वर्षी ऑक्टोबरपर्यंत राज्यात २,३०० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. शेतकऱ्यांची कर्जमाफीत फसगत झाली. यंदा १९७२ पेक्षाही भीषण दुष्काळ आहे. दुष्काळी शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी ५० हजारांची आणि फळबागायतदारांना हेक्टरी १ लाखाची मदत



जाहीर करावी, खरिपाचे कर्ज पूर्णपणे माफ करावे. शासनाने यासंदर्भात घोषणा केल्याशिवाय अधिवेशनाचे कामकाज सुरळीत चालू देणार नाही. मराठा, मुस्लिम, धनगर आरक्षणाच्या बाबतीतही शासनाने वेळकाढूपणा केला आहे. मागासवर्ग आयोगाने नुकताच शासनाला अहवाल सादर केला आहे. त्यामुळे १ डिसेंबरची वाट न पाहता शासनाने अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी मराठा आरक्षणाची घोषणा करावी, अशी मागणीही त्यांनी केली. धनंजय मुंडे म्हणाले, की शासनाने शेतकऱ्यांसोबत बेरोजगारांची, आरक्षण, महागाईच्या बाबतीतही जनतेची फसवणूक केली आहे.

महाराष्ट्र क्राईम टाइम्स
साप्ताहिक लवकरच...
औरंगाबाद, जालना येथून प्रकाशित होणार!
: कार्यकारी संपादक :
दिनेश दत्तात्रय आदमाने
मो.: 8652209100
: संपर्क कार्यालय :
औरंगाबाद जालना हायवे, चंदनझिरा जालना

## संपादकीय..

संपादक:- राकेश शंकर गोरे

# मोदी सरकारवरील वाढती नाराजी

अकाउंटिंग क्षेत्रात स्टॉक आणि फ्लो या दोन संकल्पना असतात. याद्वारे फर्मचे होल्डिंग (स्टॉक) आणि तिचा नफा-तोटा (फ्लो) कसा आहे, ते कळते. सी-व्होटरने ऑक्टोबर २०१८ मध्ये याच संकल्पना राजकारणात आजमावून पाहिल्या. त्यात पंतप्रधान आणि त्यांच्या सरकारसाठी खूप मोठा पॉलिटिकल स्टॉक असल्याचे दिसून आले. पण येथे एक नकारात्मक फ्लोची स्थितीदेखील आहे. ही स्थिती धोक्याचे संकेत देत आहे. मोदी सरकारच्या एकूण ५४ महिन्यांच्या

रफाल करारापासून सुरू झालेले हे राजकीय वादळ, 'मी टू' वाद, सबरीमला येथील मंदिरात महिलांना मज्जाव आणि सीबीआयमधील अनागोंदीने या सरकारच्या प्रतिमेला तडा गेला. मोदी सरकारचा सर्वाधिक भर महागाई, भ्रष्टाचार आणि संरक्षण धोरणावर होता. पण ऑक्टोबर २०१८ या महिन्यात सरकारला या तिन्ही मुद्द्यांवर नकारात्मकतेचा सामना करावा लागला. अर्थात पंतप्रधान मोदी आणि केंद्र सरकारची लोकप्रियता जानेवारी २०१४ मधील ट्रॅकर वेव्हमध्ये यूपीए-२च्या तुलनेत रेटिंगमध्ये अजूनही सहजतेने पुढे आहे. राहुल गांधींच्या शक्यतांमध्ये थोडीबहुत सुधारणा झाली आहे. पण नेतृत्वाच्या बाबतीत अजून त्यांना मोठा पल्ला गाठायचा आहे.



एनडीए-२च्या रेटिंगमध्ये झालेली ही घट नगण्य असली तरी हा एखादा असा बिंदू असू शकतो, जेथपासून नव्या शक्यतांचा उदय झालेला असेल. २०१९ साठीची ही स्पर्धा अधिकच रंजक होत चालली आहे. मागील सरकारच्या तुलनेत या सरकारच्या काळात जनतेच्या जीवनस्तरात काय बदल झाला, या प्रश्नावर प्रतिक्रिया देणाऱ्यांपैकी ३१.३ टक्के लोकांनी जीवनस्तर घटल्याचे सांगितले. जानेवारी २०१४ मधील याच प्रश्नाचे उत्तर २७ टक्के होते.

प्रतिक्रिया देणाऱ्यांपैकी १६.८ टक्के लोकांच्या मते, पुढील वर्षी त्यांचा जीवनस्तर आणखी घसरू शकतो. इथे आणखी एक तथ्य स्पष्टपणे दिसून येते की, प्रतिक्रिया देणाऱ्यांपैकी उर्वरित ४७.८ टक्के लोकांनी पुढील वर्षी आपला जीवनस्तर आणखी उंचावेल, अशी आशा व्यक्त केली आहे. पण हा आजवरचा सर्वात निम्न स्तर आहे. जानेवारी २०१४ च्या मोदी लाटेशी याची तुलना केल्यास त्या वेळी ७ टक्के लोकांना जीवनस्तर घसरला आणि ५३ टक्के लोकांना जीवनस्तर सुधारला, असे वाटत होते.

प्रतिक्रिया देणाऱ्या लोकांमध्ये वैयक्तिक स्तरावर 'फील गुड' प्रकारात ठळकपणे घट दिसून आली. रोजगार आणि उत्पन्न अशा वैयक्तिक विकासाच्या मानक स्तरावर मागील वर्ष अपेक्षेप्रमाणे अनुकूल नव्हते. त्यामुळे अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने काही ठिकाणी निश्चितच धोके निर्माण होत आहेत. हे सर्व त्याचेच संकेत मानले पाहिजेत. निराशादायी भूतकाळामुळे पुढील वर्षाची आशा करणाऱ्यांचे प्रमाण कमी आहे.

विशेष म्हणजे यूपीए-२च्या कार्यकाळात जानेवारी २०१४ च्या लाटेत नोंद झालेल्या आशावादापेक्षा या वेळच्या आशावादाचे प्रमाण खूप कमी आहे. राजकीय दृष्टीने ही घसरण आहे. कारण वैयक्तिक स्तरावरील कोणत्याही तक्रारी सामूहिक स्तरावरील भावना कलुषित करू शकतात. तसेच त्याचे असंतोषातही रूपांतर करू शकतात. भावनिकदृष्ट्या भारतातील विविध राज्यांचा विचार केल्यास पूर्वेकडील भाग इतर तीन भागांच्या तुलनेत जास्त आशावादी दिसतो. गंमत म्हणजे, दक्षिण भाग वगळता ज्या दोन भागांत भाजप कमकुवत आहे, त्यात पूर्वेकडील भागाचा समावेश होतो. भाजप या सकारात्मक भावनेचा फायदा घेऊ शकला तर उत्तर आणि पश्चिम भागातही सत्ताविरोधी भावनांपासून होणारे नुकसान संतुलित करता येऊ शकते. सामूहिक स्तरावर दिशा तीच असली तरी ती जास्त संतुलित आहे.

वैयक्तिक स्तरावर प्रतिक्रिया देणाऱ्या लोकांनी निराशादायी चित्र दर्शवले असले तरी त्यांच्या मते, देशात कमीत कमी काही तरी तर चांगले घडते आहे.

५१.३ टक्के लोक म्हणाले, सध्या भारत प्रगती करत आहे, देशासोबत आपणही प्रगती करत आहोत. जानेवारी २०१४ मध्ये ४६ टक्के लोकांनी असे मत मांडले होते. पण यात आणखी एक गंभीर बाब जोडावीच लागेल. ती म्हणजे भारतासोबत स्वत:च्या जीवनस्तरातही घट झाली आहे, असे म्हणणारे जुलै २०१४ नंतर प्रथमच वाढून २३.५ टक्के झाले आहेत. वैयक्तिक भावना अखेरीस सामूहिक स्तरावर कोणते रूप धारण करतात, यावर खूप काही अवलंबून असते. एनडीएच्या कार्यकाळातील सप्टेंबर २०१८ मधील आशावादी लोक यूपीए-२ कार्यकाळातील जानेवारी २०१४ च्या तुलनेत जास्त आहेत. पण निराशावादींची टक्केवारीही वाढत आहे. राजकीयदृष्ट्या हा काहीअंशी सत्ताविरोधी सुराचा प्रभाव आहे. पण एनडीएचे समर्थक या सूर विरुद्ध दिशेला वळवून हा असंतोष संतुलित करत आहेत.

तसेच महागाई पुन्हा सत्ताधारी नेत्यांसाठी नकारात्मकतेचे संकेत दर्शवत आहे. महागाई हा मते घटवणारा प्रमाणभूत घटक आहे. पेट्रोलच्या दरवाढीने सध्या सामान्यांच्या भावना दुखावलेल्या आहेत. पूर्वेकडील भाग आशावादी, तर दक्षिणेकडील भाग सर्वाधिक निराशावादी आहे. पण दोन्ही भागांत भाजपचे अस्तित्व किरकोळ आहे. निवडणुकीपूर्वीचे यूपीए-२ आणि एनडीए-२ विरुद्ध जनतेचा असंतोष त्या तुलनेत फार वेगळा नाही. संबंधित पंतप्रधानांवरील राग समान पातळी गाठत आहे. सप्टेंबर आणि ऑक्टोबर २०१८ दरम्यान केंद्र सरकारवरील जनतेचा राग वाढता दिसला.

# जिथे सागरा प्लास्टिक मिळते

सात वर्षांपूर्वी म्हणजे २०११मध्ये सोळा वर्षांचा असलेला बोयान स्लाट, ग्रीसला पाण्याखालची रंगीबेरंगी दुनिया पाहायला गेला, तेव्हा ही सहल आपलं जीवनध्येय मिळवून देणारी ठरेल हे त्याच्या गावीही नव्हतं. पण तिथल्या समुद्राखालच्या दुनियेत त्याला मासे कमी आणि प्लॅस्टिक जास्त दिसलं, त्यामुळं तो अस्वस्थ झाला. फक्त चारचौघांसारखा हा सल त्यानं सोडून न देता उरी बाळगला. आज २४ वर्षांचा बोयान, 'ओशन क्लीनअप' कंपनीचा संस्थापक आणि 'सीईओ' आहे. पाच वर्षे अखंड प्रयोग करून त्यानं आजवरचा समुद्री प्लॅस्टिकमुक्तीचा सर्वांत मोठा, महत्त्वाकांक्षी आणि पर्यावरणस्नेही प्रकल्प सप्टेंबर २०१८ मध्ये सुरू केला आहे. २०१३मध्ये या प्रकल्पासाठी वीस लाख डॉलर भांडवल लोकवर्गणीतून त्यानं उभं केलं. त्यानंतर तीन कोटी डॉलरची भर त्यात घातली. एप्रिल २०१९ पर्यंत ५० टन आणि २०४० पर्यंत संपूर्ण जगात समुद्रात जमा झालेल्या प्लॅस्टिकपैकी ९० टक्के प्लॅस्टिकचं समुद्रातून समूळ उच्चाटन हे त्याचं उद्दिष्ट आहे. आजमितीला जगातील सर्व समुद्रांमध्ये तरंगतं प्लॅस्टिक १५ कोटी टन आहे आणि त्यात प्रतिवर्षी ८० लाख टनांची भर पडते. या प्रदूषणामुळं प्रति वर्ष तेरा अब्ज डॉलरचं नुकसान सागरी जीवन, पर्यटन, मासेमारी आणि सागराधारित उद्योगांना सोसावं लागतं. सागरी अन्नातून त्यातले विषारी प्रदूषक घटक आपल्या खाण्याच्या थाळीत येतात तो धोका वेगळाच. समुद्री घाणीतील ७० टक्के भाग अशा विघटन न होऊ शकणाऱ्या प्लॅस्टिकचा आहे. आकारानुसार या प्लॅस्टिकचं वर्गीकरण केलं जातं. मेगा-प्लॅस्टिक म्हणजे प्रति कण ५० सेंमी अथवा अधिक व्यास असलेलं. त्याखाली मेक्रो-प्लॅस्टिक ५ ते ५० सेंमी व्यास, त्याखाली मेसो-प्लास्टिक ०.५ ते ५ सेंमी व्यास असलेलं आणि सर्वाधिक धोकादायक, निर्मूलन व्हायला सर्वांत अवघड - मायक्रो प्लॅस्टिक ०.०५ ते ०.५ सेंमी व्यास असणारं. सागरी जिवांना मायक्रो प्लॅस्टिक हे अन्नकण वाटतात, त्यामुळे ते अधिक धोकादायक मानलं जातं.



'ओशन क्लीनअप'नं २०१४ आणि २०१५ मध्ये प्लॅस्टिकची विखुरण समुद्रात उभ्या थरांमध्ये कशा पद्धतीनं होते हे हाय रिझोल्युशन उपकरणांनी पृष्ठभागाखाली पाच मीटरपर्यंत मोजलं. प्लॅस्टिकचे कण आकारानं जितके रोडावत जातील, तितके ते समुद्री वारे आणि लाटांमुळे अधिकाधिक समुद्रात मिसळतात. पण खवळलेल्या समुद्रातही ते पाण्याच्या पृष्ठभागावर किंवा त्याच्या जरा खाली राहतात. मोठे तुकडे तर अधिक तरणक्षमतेमुळं वरच तरंगतात. पाण्याहून वजनानं जड, खाली बुडणारे प्लॅस्टिकही प्रदूषण घडवतात, पण तुलनेनं त्याचं प्रमाण कमी. 'ओशन क्लीनअप'च्या निष्कर्षांनुसार आज समुद्रात शिरलेलं ९२ टक्के प्लॅस्टिक आकारानं मोठंच आहे.

## शब्दकोडे क्रमांक - ३४



**आडवे शब्द**

१. पुरोगामी, आधुनिक विचारांचा ४. हिरव्या रंगाचा कीटक ७. साडेसातीचा अडीच वर्षांचा दुसरा टप्पा ९. काचेवरील ओरखडा १०. नित्यनेमाने केलेले वाचन ११. 'जगी हा खास वेड्यांचा --- माजला सारा' (रणदुंदुभी नाटकातील मा.दीनानाथ यांचे गाजलेले पद) १२. अडथळा, पाचर १३. आमदार-खासदारांनी घातलेल्या गोंधळासाठी रूढ झालेला शब्द १५. गंगाजल १७. कैकेयीची दासी १८. हिंदीत पैंजण २०. पहारा, रक्षण २१. अंतर्गत २२. साद २४. अनामिकेशेजारील बोट २४अ. धमनी, नाडी २५. बांबू २७. आठवड्यातील दिवस २८. तोल सांभाळण्याची कामगिरी ३०. पथारी ३३. नाहक, विनाकारण ३५. कार्तिकेयाच्या मुखांची संख्या ३६. शाहीराजवळचे वाद्य ३८. नाडी ३९. जिन्नस ४०. पद्धत ४१. एक प्रायश्चित कर्म ४२. चिंता ४४. कर्णाची उपाधी ४५. सगेसोयरे ४७. बहुपेडी साखळी ४८. वावडी, ऐकीव गोष्ट ५०. आभाळ ५१. अदृश्य ५४. पर्वत ५६. खण पण चोळीचा नव्हे ५७. पोपट ५९. बाणेदार स्त्री, जयश्री गडकर यांचा गाजलेला चित्रपट ६१. मृदंग ६३. लक्ष्मी ६४. कोर्टातील विरुद्ध पक्ष ६६. 'जैसे थे' परिस्थिती ६७. फटफजिती होईल असे ७०. बाण ७२. पाणी ओघळून जाईल असा उतार ७३. मुलगा, पुत्र ७४. एकत्रित भोजन ७५. नवलाची कामगिरी

**उभे शब्द**

१. गृहमंत्री सुनेच्या लेखी सासूबाई म्हणजे - २. प्रवाह ३. ललाट ४. दुर्लक्ष, हेळसांड ५. वाळवंट ६. अणकुचीदार ७. तोंड लपवून स्वदेश सोडण्याची वेळ आलेला ८. धनुष्यबाण ११. लुटालुट १२. हिंदीत काकडी १४. ताबडतोब पैसे मोजून १६. गौरवर्णी, साजिरी १८. स्तर १९. बारीकसारीक, किरकोळ २१. चूक, अवमान २३. उणीव, कमतरता २४. नव्या नोटेचा स्पर्श २६. काखेत मावणारी घागर २७. प्रशंसेचा उद्गार २८. सत्त्वयुक्त २९. त्वरित, अचानक ३१. हा प्रामाणिक असेल तर देशाची तिजोरी भरते ३२. गावभर स्वैर भटकणारी ३४. नातेवाईक ३७. मोबदला, परिणाम ४३. पाणी, आयुष्य ४५. हिंदीत अपवित्र ४६. कोट, किल्ला ४९. रममाण झालेला ५२. पावलोपावली, सतत ५३. पाच दिवस काम असेल तर हा देखील सुट्टीचा दिवस ५५. चांदोबाची सुट्टी! ५८. दागदागिने ६०. फार, खूप ६२. प्राप्ती, आवक ६५. घाव, प्रहार ६७. सोने ६८. उणीव पण न भासणारी ६९. राज्य ७१. ज्वाला, दाह

## थोडक्यात महत्वाचे

# अंबरनाथमध्ये घर घेऊ नका!

### शहरातील वायू आणि जलप्रदूषणाने स्थानिक नागरिक त्रस्त

**अंबरनाथ (दिनेश वाजे)-** ठाणे, कल्याण या शहरांपाठोपाठ झपाट्याने विकसित होत असलेल्या अंबरनाथ शहरातील वायू आणि जलप्रदूषणाने स्थानिक नागरिकांचा जीव नकोसा केला आहे. आकर्षक दर आणि निसर्गरम्य वातावरणाच्या जाहिरातींना भुलून अंबरनाथमध्ये घरे खरेदी करणाऱ्या नागरिकांना आता येथे वास्तव्य करणे अशक्य वाटू लागले आहे. त्यामुळेच आता काही नागरिकांच्या एका गटाने 'अंबरनाथमध्ये घरे घेऊ नका' असे आवाहन करणारी मोहीमच समाजमाध्यमावरून सुरू केली आहे. ठाणे तसेच आसपासच्या शहरांचे वेगाने होत असलेले नागरीकरण येथील बांधकाम उद्योगासाठी नेहमीच सकारात्मक ठरले आहे. ठाण्यातील घोडबंदर, दिवा-कल्याण मार्ग, कल्याण-टिटवाळा, भिवंडी तसेच अंबरनाथ-बदलापूर या पट्ट्यात मोठ्या प्रमाणावर गृहसंकुलांची बांधकामे सुरू असून गेल्या काही वर्षांत मंदीच्या चर्चेनंतरही बांधकाम उद्योगांसाठी हे टापू महत्त्वाचे मानले जात आहे. मुंबई, ठाण्याच्या गर्दीपासून दूर असलेला अंबरनाथ, बदलापूर परिसर हा निसर्गरम्य तसेच तुलनेने शांत असल्याने सुरुवातीच्या काळात सेकंड होम घेणाऱ्यांसाठीही हा भाग महत्त्वाचा पर्याय समजला जात होता. आता येथे होणारी वाहनकोंडी, प्रदूषण, कचराभूमीमुळे बांधकाम उद्योगालाही अवकळा आल्याची चर्चा आहे.



## सुडोकू क्रमांक - ३४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2 | | 5 | 7 | | 1 | |
| 8 | | | 1 | 9 | | 6 | | 5 |
| 1 | 4 | | 6 | | | | | |
| | | 9 | 8 | | | 5 | | 4 |
| | | | | | | | | |
| 5 | | 3 | | | 1 | 9 | | |
| | | | | | 5 | | 4 | 2 |
| 9 | | 1 | | 2 | 8 | | | 7 |
| | 2 | | 7 | 6 | | 1 | | |




**सुविचार** आयुष्यात भेटणारी सगळीच माणसे सारखी नसतात.

## साप्ताहिक राशिभविष्य

**मेष-** आपले मन धार्मिक, अध्यात्मिककडे झुकल्याने मानसिक शांती मिळेल. जीवनसाथीकडून आपल्याला पूर्ण सहकार्य मिळेल.

**वृषभ-** व्यापारात अचानक परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. व्यापारात वाढ होईल.

**मिथुन-** मित्रांच्या सहकार्याने आपली अडकलेली काम पार पडतील. आपल्याला विशेषाधिकार प्राप्त होतील.

**कर्क-** आपल्या योजनेप्रमाणे कार्य पार पडतील. सौजन्यपूर्वक व्यवहार आपल्याला अडचणीतून वाचवील.

**सिंह-** मित्र व हितचिंताकांच्या भेटी होतील आईची तब्येत ठिक राहील. गृहोपयोगी वस्तू खरेदी करण्याचा योग चांगला चालेल.

**कन्या-** आपली बुद्धीवादी समस्या सुटेल. सुख समृद्धी वाढेल. हलगर्जीपणाची कामे टाळा. घाईगडबडीने कामे करू नका.

**तूळ-** जी कोणीही व्यक्ति आपल्या संपर्कात येईल तिला आनंदच वाटणार आहे. कामाच्या प्रती बेजबाबदार राहू नका.

**वृश्चिक-** नवीन योजना अमलात आणाल. परिवारात वातावरण चांगले राहील. आर्थिक स्थिती चांगली.

**धनु-** आवक-जावक वाढेल. चलाखीमुळे थांबलेली कामे पूर्ण होतील. यश, प्रतिष्ठा वाढेल.

**मकर-** कार्यक्षेत्रात भरभराटीचे योग आहेत. ओळख वाढेल. नवीन कामकाजामुळे आपल्याला मान मिळेल.

**कुंभ-** वाद-विवाद, भांडण तंटे होण्याची शक्यता. धंद्यात लक्ष द्या. वेळीच लक्ष न दिल्यास नुकसान होवू शकते.

**मीन-** व्यवहारात अडचणी येतील. परेशानी व धावपळ वाढेल. परिश्रमाच्या मानाने त्याचे फळ कमी मिळेल.



महाराष्ट्र शासन
ई- निविदा सूचना क्र.
http://mahatenders.gov.in
1. Supply Table and Chair in Mantralaya Canteen Mezzanine flr Main Bldg Mantralaya Mumbai
1) http://mahapwd.com
2) http://mahatenders.gov.in
कार्यकारी अभियंता


हे मराठी साप्ताहिक **मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक राकेश गोरे** यांनी सोमानी प्रिंटिंग, प्रेस गाला नं. ३-४, अमिन इंडस्ट्रीयल इस्टेट, सोनावाला क्रॉस रोड नं. २,जवाहर नगर फाटक ब्रिज जवळ, गोरेगांव (पूर्व), मुंबई- ४०० ०६३. येथे छापून विष्णू सदन सोसायटी रामचंद्र सुखई सोसायटी नं. १, रूम नं. ४, जयहिंद नगर, खार (पूर्व), मुंबई- ४०० ०५१. येथे प्रकाशित केले. R.N.I. NO. MAHMAR/2010/33301. Mob. 9892631863, 9892632268, 022-69998811, website:maharashatracrimetimes.com, **Email-Info@maharashtracrimetimes.com** maharashtracrimetimes33301@gmail.com, **कायदेशीर सल्लागार-** एडवोकेट, हाईकोर्ट मुंबई, डी. के. पांडे (बी.ए.एल.एल.बी.) हा अंक प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख ह्यामधील मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही (मुंबई न्याय कक्षेत)

# मुंबईतील ४७ स्थानकांची सुरक्षा वाढवणार



**मुंबई (विशाल कारंदे)-** मुंबई उपनगरीय रेल्वे मार्गावरील ४७ स्थानकांत एकात्मिक सुरक्षा यंत्रणेचा (इंटिग्रेटेड सिक्युरिटी यंत्रणा) दुसरा टप्पा राबविण्यात येणार असून त्यामुळे सुरक्षा व्यवस्था मजबूत होणार आहे. यामध्ये पश्चिम रेल्वेवरील ३०, तर मध्य रेल्वेवरील १७ स्थानकांचा समावेश असल्याची माहिती रेल्वे सुरक्षा दलाचे महासंचालक अरुण कुमार यांनी दिली.

२६ नोव्हेंबर रोजी मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याला दहा वर्षे होत असतानात रेल्वे स्थानकांतील सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. या हल्ल्यानंतर देशभरातील २०२ रेल्वे स्थानकांत एकात्मिक सुरक्षा यंत्रणेंतर्गत सुरक्षेचे विविध उपाय योजण्यात आले. यामध्ये मुंबईताल स्थानकांचाही समावेश होता. त्याच्या दुसऱ्या टप्प्याचा विस्तार करताना मुंबईतील ४७ स्थानकांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये पश्चिम रेल्वेवरील मुंबई सेन्ट्रल, वांद्रे टर्मिनस, अंधेरी, बोरिवली, चर्चगेट, मरीन लाईन्स, चर्नी रोड, ग्रॅण्ट रोड, महालक्ष्मी, लोअर परळ, प्रभादेवी, दादर, माटुंगा रोड, माहिम, वांद्रे, खार रोड, सांताक्रूझ, विलेपार्ले, जोगेश्वरी, गोरेगाव, राम मंदिर, मालाड, कांदिवली, दहिसर, मीरा रोड, भाईंदर, नायगाव, वसई रोड, नालासोपारा, विरार या स्थानकांचा समावेश आहे. डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर, सीसीटीव्ही, बॅगेज स्कॅनर मशीन यासह अन्य काही सुरक्षा उपाययोजना राबविण्यात येतील.

# मराठा आरक्षणः मुख्यमंत्र्यांविरोधात हक्कभंग प्रस्ताव आणणार- विखे-पाटील

**मुंबई (विकास नालुगडे)-** मागासवर्गीय आयोगाचा अहवाल सभागृहात सादर होण्यापूर्वीच 'आता आंदोलन करू नका, १ डिसेंबरला जल्लोष करा' असे वक्तव्य करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहाचा हक्कभंग केलेला आहे. त्यामुळे येत्या हिवाळी अधिवेशनात त्यांच्याविरोधात हक्कभंग प्रस्ताव आणणार असल्याची भूमिका विधानसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे नेते राधाकृष्ण विखे-पाटील यांनी मांडली.

मराठा समाजाच्या आरक्षणासह विविध मागण्यासांठी मुंबईत आझाद मैदानावर सकल मराठा क्रांती मोर्च्याच्या वतीने उपोषण सुरु आहे. उपोषणाचा शनिवार हा १६ वा दिवस होता. या आंदोलनकर्त्यांना भेटायला गेल्यानंतर विखे-पाटीलांनी माध्यमांसमोर बोलताना याबाबत सांगितले.



सरकारचा हा कोडगेपणा आहे. मागील १६ दिवसांपासून आंदोलनकर्ते उपोषणास बसले आहेत. अशावेळी कोणत्याही परिस्थितीत आंदोलकांना बोलावले जाते. सरकार जाणीवपूर्वक त्यांच्याकडे दुर्लक्ष करत आहे. मंत्री फिरकायला तयार नाहीत. ते समाजामध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप विखे-पाटीलांनी केला. मागील १६ दिवसांपासून हे आंदोलनकर्ते विविध मागणीसाठी उपोषणास बसले आहेत. पण सहकार मंत्री सुभाष देशमुख वगळता स्वत: मुख्यमंत्री किंवा त्यांच्या प्रतिनिधीने आंदोलनकर्त्यांची भेट घेतली नाही. देशमुख यांनी मुख्यमंत्र्यांना कळवू असे म्हटले. पण त्यानंतरही काहीच झाले नसल्याचे ते म्हणाले.

# मराठा आरक्षण निर्णयावरून दोन्ही काँग्रेसचे नुकसान?

**मुंबई (केदार पंढरीनाथ)-** लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर मराठा आरक्षणाचा मुद्दा सोडविण्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भर दिल्याने या मुद्द्यावरून राजकारण करणाऱ्या राष्ट्रवादी व काँग्रेसला फटका बसला आहे. आरक्षणाचा मुद्दा योग्यपणे मार्गी लागल्यास त्याचा फटका राष्ट्रवादीला बसू शकतो. दुसरीकडे शिवसेनेच्या राजकीय कार्यक्रम पत्रिकेवरच मराठा आरक्षणाचा मुद्दा नसल्याने सेनेचा ना नफा, ना तोटा होणार आहे. आरक्षणाची अनेक वर्षे मागणी करणाऱ्या मराठा समाजाला जल्लोष करण्यासाठी १ डिसेंबरला सज्ज राहण्याची गोड बातमी मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली आहे. येत्या रविवारी होणाऱ्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्य मागासवर्ग आयोगाचा अहवाल स्वीकृत करून पुढील दिशा ठरविली जाईल. मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय भाजप सरकार घेणार असले तरी कायदेशीर लढाई मोठी असल्याची सत्ताधारी भाजप नेत्यांना कल्पना आहे. निवडणुकीपूर्वी आरक्षणाच्या निर्णयाला उच्च न्यायालयाने स्थगिती दिल्यास त्याचे राजकीय परिणाम भोगावे लागतील याचीही भाजप नेत्यांना चिंता आहे.



२००४, २००९ आणि २०१४च्या विधानसभा निवडणुकांच्या वेळी राष्ट्रवादीने मराठा आरक्षणाचा मुद्दा मांडून मराठा मतदारांना आपलेसे करण्याचा प्रयत्न केला होता. कोपर्डी दुर्घटनेच्या निषेधार्थ राज्यात निघालेल्या मराठा समाजाच्या मोर्च्यांना राष्ट्रवादीची फूस असल्याची चर्चा झाली होती किंवा भाजप नेत्यांनी तसा जाहीरपणे आरोप केला होता. मराठा आरक्षणाचा मुद्दा मार्गी लागल्यास राष्ट्रवादीच्या शिडातील हवा जाऊ शकते. कारण या मुद्द्यावर पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यात राजकीय लाभ उठविण्याचा मुद्दाच राष्ट्रवादीच्या हातून जाणार आहे. काँग्रेसला मराठा समाजाची पारंपारिक मते मिळतात. पण राष्ट्रवादीशी आघाडी केल्याने मराठा समाजाच्या मतांचा होणारा लाभ काँग्रेसला मिळणार नाही.

## परळ टर्मिनस डिसेंबरमध्ये सुरू?

**मुंबई (नवनाथ कारंडे)-** पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा व विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर परळ टर्मिनसचे काम डिसेंबर २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश मध्य रेल्वे महाव्यवस्थापकांनी संबंधित विभागांना दिले आहेत. त्यामुळे कामाला गती मिळाली असून पुढील महिन्यात परळ टर्मिनसवरून लोकल सुटण्याची शक्यता



निर्माण झाली आहे. दादर स्थानकावरील भार कमी करण्यासाठी आणि परळमधील गर्दीच्या नियोजनासाठी हे टर्मिनस मार्च २०१९ पर्यंत सेवेत आणण्याचे उद्दिष्ट याआधी ठेवण्यात आले होते.

गेल्या काही वर्षांत दादर स्थानकावरील लोकल व प्रवाशांचा भार वाढला आहे. परळ स्थानकातही तीच परिस्थिती आहे. परळमधील सरकारी, खासगी कार्यालये, रुग्णालये तसेच लागूनच असलेले एल्फिन्स्टन रोड स्थानकामुळे परळ स्थानकावरही मोठा भार पडत आहे. हे पाहता परळ स्थानकाचा विस्तार करण्याचा निर्णय घेण्यात आला. मुंबई अर्बन ट्रान्सपोर्ट प्रकल्प- २ (एमयूटीपी- २)मधील सीएसएमटी ते कुर्ल्यापर्यंतच्या पाचव्या-सहाव्या मार्गाचे काम सुरू असून याच प्रकल्पात परळ टर्मिनस प्रकल्प पूर्ण करण्याचे काम हाती घेण्यात आले. परळ टर्मिनस ९० कोटी रुपये खर्च करून २०१५ सालीच पूर्ण केले जाणार होते. प्रत्यक्षात दोन वर्षांपूर्वी कामाला सुरुवात करण्यात आली. प्रकल्पात पूर्वी अस्तित्वात असलेल्या फलाट क्रमांक एकच्या बाजूलाच एक टर्मिनसचा मार्ग बांधण्यात आला असून त्याच्या दोन्ही बाजूला फलाट आहे.

# आरोग्य विभागाचेच कुपोषण!

**मुंबई (महेश वारणकर)-** जागतिक आरोग्य संघटनेच्या निकषानुसार सकल राज्य उत्पन्नाच्या किमान चार टक्के रक्कम आरोग्यावर खर्च होणे अपेक्षित आहे. मात्र, महाराष्ट्रात आरोग्यावर फक्त सव्वा टक्के रक्कम खर्च करण्यात येत असून तीही पूर्णपणे वापरण्यात येत नाही. तसेच आरोग्य विभागात डॉक्टरांसह १५,२९४ पदे रिक्त असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. राज्याच्या आरोग्य अर्थसंकल्पाचे आकारमान सुमारे नऊ हजार कोटी रुपये असून, प्रत्यक्षात वित्त विभागाकडून ही रक्कम कधीच दिली जात नाही. २०१८-१९ साठी आरोग्य विभागाने ४,१११ कोटी रुपयांची मागणी केली असताना वित्त विभागाने अवघे १,७४२ कोटी रुपये मंजूर केले. गेली चार वर्षे सातत्याने पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून आरोग्य विभागाला आपल्या खर्चासाठी वित्त विभागाकडे हात पसरावे लागतात. निधीअभावी औषध खरेदीत हात आखडता घ्यावा लागत असून, रुग्णालयांमध्ये औषधे उपलब्ध नसल्यामुळे आरोग्य विभागाच्या डॉक्टरांना रुग्णांच्या संतापाचा सामना करावा लागतो. राज्याच्या आरोग्याचा कारभार सेंट जॉर्ज रुग्णालयातील ज्या 'आरोग्य भवन' येथून चालतो



त्या संचालनालयाच्या अखत्यारीतील आरोग्य संचालक, अतिरिक्त संचालक, सहसंचालक, उपसंचालक, सहसंचालक, जिल्हा शल्यचिकित्सकांसह वैद्यकीय अधिकाऱ्यांची तब्बल २,६९० पदे गेल्या चार वर्षांत भरण्यातच आलेली नाहीत. शिवाय महाराष्ट्र वैद्यकीय अधिकारी गट 'अ', गट 'ब', बीएएमएस डॉक्टर तसेच गट 'क' व 'ड'ची जवळपास १५,२९४ पदे रिक्त असल्याचे आरोग्य विभागाच्या सूत्रांनी सांगितले. याशिवाय बालरोगतज्ज्ञ, स्त्रीरोगतज्ज्ञ, नेत्रविशारद, अस्थिरोगतज्ज्ञ, मनोविकारतज्ज्ञ आदी ४८० पदे रिक्त आहेत.

# मुंबईतील सफाई कर्मचाऱ्यांचे 'काम बंद' आंदोलन

**मुंबई (दिव्या जोशी)-** मुंबई महापालिकेने शहरातील कचरा गोळा करुन डम्पिंग ग्राऊंडपर्यंत पोहोचवण्याचे काम पूर्णपणे कंत्राटदाराकडे सोपवण्याचा निर्णय घेतला असून या निर्णयाविरोधात मुंबई महापालिकेतील कंत्राटी कामगार शुक्रवार पासून संपावर गेले आहेत. मुंबईतील २४ विभागांमध्ये कार्यरत असलेल्या कंत्राटी कामगारांनी शुक्रवारपासून कामबंद आंदोलन सुरु केले असून यामुळे मुंबईत कचरा कोंडी झाली आहे. मुंबई महापालिकेने बुधवारपासून शहरातील साफसफाईचे काम कंत्राटदाराकडे सोपवण्याचा निर्णय घेतला. मात्र, यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून महापालिकेत काम करणाऱ्या शेकडो कंत्राटी कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. तर कायमस्वरुपी सफाई कामगारांना अन्य विभागांमध्ये सामावून घेतले जाणार आहे.

# आता खासगी शिवशाही चालकांना महामंडळाकडून प्रशिक्षण!

**ठाणे (तृप्ती गोरे)-** एसटीची आधुनिक ओळख म्हणून महामंडळात दाखल झालेली शिवशाहीअपघातांच्या सत्रात अडकली आहे. शिवशाहीचेअपघात रोखण्यासाठी एसटी महामंडळाने चालकांना विशेष प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. परिवहनमंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष दिवाकर रावते यांचा 'ड्रीम प्रोजेक्ट' असलेल्या शिवशाहीच्या अपघातांचा आलेख हा चढाच आहे. शिवशाहीवरील अपघात रोखण्यासाठी महामंडळाकडून उपाययोजनांवर भर देण्यात येत असून २४ विभागांतील सुमारे २ हजार ५०० चालकांसह तांत्रिक अधिकारी-कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण करण्यात आले. पहिल्या टप्प्यात स्वमालकीच्या शिवशाहीच्या चालकांसह वाहतूक निरीक्षक (प्रशिक्षण), तांत्रिक पर्यवेक्षक यांना महामंडळाच्या



पुणे येथील मध्यवर्ती प्रशिक्षण संस्थेत शिवशाहीबाबत प्रशिक्षण दिले असून दुसऱ्या टप्प्यात खासगी शिवशाहीवरील चालकांना प्रशिक्षण मिळेल. नोव्हेंबर अखेर प्रशिक्षण प्रक्रिया सुरू होणार असल्याचे वाहतूक विभागाचे महाव्यवस्थापक आर.आर. पाटील यांनी सांगितले. शिवशाहीच्या बैठ्या आणि शयनयान श्रेणीतील बसची लांबी, उंची यांच्यात साध्या एसटीच्या तुलनेत फरक आहे. त्याचबरोबर आधुनिक पद्धतीची बांधणी असल्यामुळे साध्या एसटीच्या तुलनेत शिवशाही चालवताना विशेषत: वळण घेताना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे स्वमालकीच्या एसटी चालकांनी सांगितले.

एसटी महामंडळात एकूण २ हजार शिवशाही दाखल होतील. पहिल्या टप्प्यातील १२०० शिवशाहींपैकी सध्या ९७५ शिवशाही राज्यात धावत आहेत.

यापैकी ४८० शिवशाही या खासगी कंपन्यांच्या असून यात ६८ शयनयान आणि ४१२ बैठ्या आसनी शिवशाहीचा समावेश आहे. महामंडळाच्या मालकीच्या ४९५ शिवशाही प्रवाशांच्या सेवेसाठी धावत आहेत. सद्य:स्थितीत एकूण २६० पेक्षा अधिक शिवशाही या अपघातग्रस्त झाल्या आहेत. यापैकी सुमारे २०० अपघात हे गंभीर स्वरूपाचे असल्याचे अधिकाऱ्यांनी नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले.

# 'भंडारी समाज महासंघ' आणि 'लायन्स क्लब' आयोजित 'भव्य आरोग्य शिबीर' दादर प्रभादेवी येथे महानगरपालिका मैदानावर संपन्न





**मुंबई (योगेश होळंब)-** दिनांक १८ नोव्हेंबर २०१८ रोजी सकाळी १० ते २ या वेगळेत 'भंडारी समाज महासंघ' आणी 'लायन्स क्लब' आयोजित 'भव्य आरोग्य शिबीर' दादर प्रभादेवी येथे महानगरपालिका मैदानावर पार पडला. भव्य अशा आरोग्य शिबीराला प्रभादेवी वासीयांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला. शिबीरासाठी डॉ. प्रल्हाद शर्मा व त्यांचे सहकारी यांनी शिबीरार्थिंची सेवा केली. शिबिरामध्ये जनरल बॉडी तपासणी, मधूमेह तपासणी , बि. एम. आय. तपासणी , डोळे तपासणी, दांत तपासणी इत्यादी तपासण्या ठेवण्यात आल्या होत्या. शिबीर सूरू असताना भंडारी समाजातील प्रतिष्ठित तसेच जेष्ठ व्यक्ती आणी आदी मान्यवर उपस्थित राहून शिबीर आयोजकांना शुभेच्छा दिल्या. भंडारी समाज महासंघाचे अध्यक्ष तुषार विजय कांबळी यांनी योगेश रघुवीर होळंब यांना वरिष्ठ प्रतिनिधी- 'महाराष्ट्र क्राईम टाइम्स - साप्ताहिक वृत्तपत्र ' तसेच समाज बांधव म्हणून शिबीरासाठी आमंत्रित करून त्यांचा सत्कार करण्यात आला.




निविदा सूचना क्र.

Providing General Pest Control services Anti termite Treatment ... Rodent Baits Glue Pads to Mantralaya Main & Annex bldg for 1 year

Rs 26,41,710/-


# देशी बनावटीचा एक गावठी कट्टे जप्त

**पनवेल (पनवेल)-** पनवेल भागात पिस्तुल, देशी बनावटीचे कट्टे, दोन बंदुकी व जिवंत काडतूस विक्रीसाठी घेऊन आलेल्या व्यक्तीला नवी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने सापळा लावून अटक केली. शाहीद दाऊद काझी (३८) असे या व्यक्तीचे नाव आहे. पोलिसांनी त्याच्याजवळ असलेले २ देशी बनावटीचे पिस्तुल, १ देशी बनावटीचा कट्टा व ३ जिवंत काडतूस असा शस्त्रसाठा हस्तगत केला. ही शस्त्रे त्याने कुठून व कुणाला विक्री करण्यासाठी आणली होती, याबाबत अधिक तपास सुरू असल्याची माहिती गुन्हे शाखेचे पोलिस उपआयुक्त तुषार दोशी यांनी दिली.

शुक्रवारी सांयकाळी पनवेल एसटी स्टँडच्या पाठीमागील भागात एक व्यक्ती गावठी कट्टे, पिस्तुल आदी शस्त्रसाठा विक्री करण्यासाठी येणार असल्याची



माहिती गुन्हे शाखा युनिट-२च्या पथकाला मिळाली होती. त्यानुसार युनिट-२चे वरिष्ठ पोलिस निरीक्षक एन. बी. कोल्हटकर व त्यांच्या पथकाने शुक्रवारी सायंकाळी पनवेल एसटी स्टँडच्या पाठीमागील भागात सापळा लावला. सायंकाळी पावणे सात वाजण्याच्या सुमारास त्याठिकाणी आलेल्या शाहीद दाऊद काझी (३८) या संशयित व्यक्तीला पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याच्याकडे असलेल्या बॅगेची तपासणी केली असता, २ देशी बनावटीचे पिस्तुल, १ गावठी कट्टा त्याचप्रमाणे ३ जिवंत काडतुसे आढळून आली. त्यामुळे पोलिसांनी अधिक चौकशी केली असता, त्याला समाधानकारक उत्तर देता आले नाही. त्यामुळे पोलिसांनी त्याला बेकायदा शस्त्र बाळगल्याप्रकरणी अटक केली.

# गोठवलेल्या खात्यांतून पगार देण्यास परवानगी

**मुंबई (सम्यक कासारे)-** कर्मचाऱ्यांचा पगार आणि दिवाळीचा बोनस देण्यासाठी गोठवलेल्या खात्यांतून पैसे काढण्याची एन. के. प्रोटीन प्रायव्हेट कंपनीला उच्च न्यायालयाने परवानगी देत दिलासा दिला. नॅशनल स्टॉक एक्सचेंज लिमिटेड एनएसईएल आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी एन. के. प्रोटीनचे खाते आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागाने ईओडब्ल्यू गोठवले होते. खात्यातील ४.१५ कोटींची रक्कम काढण्यास नुकतीच उच्च न्यायालयाने परवानगी दिली. महाराष्ट्र प्रोटेक्शन ऑफ इंटरेस्ट ऑफ डिपॉझिटर्स इन फायनान्शिल एस्टॅब्लिशमेंट एक्ट अर्थात एमपीआयडी कायदा- १९९९ कलम ४ व ५ नुसार अंमलबजावणी संचालनालयाने १८ ऑक्टोबरला काढलेल्या नोटीफिकेशनला



कंपनीने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. या कायद्यानुसार ईडीने आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी कंपनीची चार खाती आणि ३५ वाहने जप्त केली होती. एनएसईएलच्या पाच हजार कोटींच्या गैरव्यवहारात तब्बल १३ हजार गुंतवणूकदारांना गंडा घालण्यात आल्याचा आरोप कंपनीवर आहे. एमपीआयडी कायद्यासह भारतीय दंडसंहितेतील विविध कलमांर्तगत ईओडब्ल्यूने कंपनीविरोधात २०१३ मध्ये गुन्हा दाखल केला होता. कंपनीविरोधात केलेली कारवाई गळचेपू असून त्यामुळे कंपनीला कर्मचाऱ्यांचा पगार देण्यात अडचणी येत असल्याची बाब कंपनीच्या वतीने ज्येष्ठ वकील मिलिंद साठे यांनी उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली; मात्र ईओडब्ल्यूच्या वकिलांनी यावर आक्षेप घेत याप्रकरणी अद्याप सुमारे ९६० कोटींचे व्यवहार तपासणे बाकी असल्याचे सांगितले. ईडीने जप्त केलेली मालमत्ता सुमारे एक हजार कोटींची असून रक्कम काढण्याची परवानगी दिल्यास खात्यांतील व्यवहार तपासणे अवघड जाईल, परंतु कर्मचाऱ्यांचे वेतन रखडू नये म्हणून न्या. रणजित मोरे आणि न्या. भारती डांगरे यांच्या खंडपीठाने गोठवलेल्या खात्यातून रक्कम काढण्याची मुभा देत असल्याचे स्पष्ट करत सुनावणी तहकूब केली.

# पॉर्न साईटवर नवऱ्याने टाकले बायकोचे फोटो आणि मोबाईल नंबर

**नवी दिल्ली (हिंदुस्थान समाचार)-** कोणत्या कुटुंबाला नवरा बायकोचे भांडण चुकले नसल्याचे म्हणतात. पण किरकोळ भांडणही काही महाभाग टोकापर्यंत नेतात. काहीसा असाच भयानक प्रकार समोर आला आहे. या 'महाभागा'ने बायकोसोबत झालेल्या भांडणाचा राग म्हणून तिचे फोटो आणि मोबाईल नंबर पॉर्न साईट्सवर टाकण्याचा प्रताप केला आहे. महिलेला यानंतर वेगवेगळ्या ठिकाणाहून फोन्स येऊ लागले. या संदर्भात तिने जवळच्या पोलीस स्थानकात तक्रार केली. या प्रकरणी पोलिसांनी शोध सुरु केला.

तिचे फोटो आणि मोबाईल नंबर पॉर्न साइटवर टाकणारा तिचा पतीचे असल्याचे तपासात समोर आले. नोएडातील सेक्टर २७ मधून रविवारी या पतीला ताब्यात घेण्यात आले आहे. हे पती पत्नी मुळचे ओडिसाचे राहणारे असून सेक्टर ३ मधील एका कंपनीत पती असोसिएट कंसल्टंट पदावर तर बीपीओमध्ये पत्नी कार्यरत आहे. दोघांचे २०११साली लव्ह मॅरेज झाले. कोणत्या तरी कारणावरून दहा महिन्यापूर्वी दोघांमध्ये भांडण झाले.



दोघांनी त्यानंतर वेगळे राहण्याचा निर्णय घेतला आणि मुलीला पत्नीने स्वत:कडे ठेवून घेतले. पतीने वेगळे रहायला लागल्यानंतर तिच्या हालचालींकडे फेसबुकच्या माध्यमातून लक्ष ठेवायचो असे सांगितळे. पत्नी आपल्याशी विभक्त होऊनही खुश आहे आणि ऑफिसमधून बाहेर आऊटींगलाही जात आहे तेव्हा त्याला संताप अनावर झाला.

## राज्यात फेसबुक वापरकर्त्यांपैकी ४० टक्के व्यक्ती फेसबुकवर सक्रिय

**औरंगाबाद (विकास नालुगडे)-** महाराष्ट्रातील एकूण फेसबुक वापरकर्त्यांपैकी ४० टक्के व्यक्ती या मराठी भाषिक फेसबुकवर सक्रिय आहेत.शहरनिहाय फेसबुकवर ॲक्टिव्ह असणा-या मराठी भाषिकांचा केलेल्या एका



सर्वेक्षणानुसार औरंगाबाद हे शहर आघाडीवर असल्याचे दिसून आले आहे.या शहरात फेसबुक वापरणा-या व्यक्तींची संख्या ८.१० लाख असून त्यापैकी फेसबुक वापरणा-या मराठी भाषिकांची संख्या ५.९० लाख इतकी असून त्याची टक्केवारी ७२. ८४ आहे. सामाजिक माध्यमे आणि जनसंज्ञापन या विषयाचे अभ्यासक व्यंकटेश कल्याणकर यांनी केलेल्या एका सर्वेक्षणातुन ही माहिती समोर आली आहे.

संशोधनानुसार मुंबईतील एकूण फेसबुक वापरकर्त्यांच्या तुलनेत एक तृतीयांशपेक्षाही कमी वापरकर्ते हे मराठी भाषिक आहेत. तसेच इतर चार शहरांच्या तुलनेत औरंगाबादमध्ये मराठी भाषिकांचे फेसबुक वापरण्याचे प्रमाण हे सर्वाधिक आहे. पुण्यातील ४४ टक्क्यांपेक्षा अधिक फेसबुक वापरकर्ते हे अमराठी आहेत. तर मुंबईनंतर सर्वाधिक अमराठी भाषिक नागपूरमध्ये त्यापाठोपाठ पुण्यात असल्याचे दिसून आले आहे.

मराठी फेसबुक वापरकर्ता हे अचुकपणे शोधून काढण्याकरिता एखाद्या फेसबुक वापरकर्त्याने आपली ओळख कुठल्या भाषेच्या माध्यमातून केली आहे, तसेच त्याने कुठल्या मराठी वृत्तपत्रांना, मराठी वेबसाईटला आपली पसंती दर्शविली आहे.

# 'काँग्रेस संस्कृतीमुळे देशाचं नुकसान'

**नवी दिल्ली (हिंदुस्थान समाचार)-** काँग्रेस सरकारच्या अटकवण्याच्या, लटकवण्याच्या आणि भटकवण्याच्या संस्कृतीमुळे देशाचं भरपूर नुकसान झालं आहे अशी टीका पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केलं आहे. हरयाणाला दिल्लीशी जोडणाऱ्या एक्सप्रेस वेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. हरयाणाला दिल्लीशी जोडणाऱ्या केएमपी एक्स्प्रेसवेचं आज पंतप्रधान नरेंद्र मोदींनी उद्घाटन केलं. यावेळी हरयाणाचे मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टरही उपस्थित होते. १२ वर्ष जुन्या या प्रकल्पामुळे दिल्ली हरयाणा हायवेवरील वाहतूक कोंडी कमी होणार आहे. जड वाहनांची या हायवेमुळे भरपूर सोय होणार आहे. यावेळी या



प्रकल्पाबद्दल बोलताना मोदींनी काँग्रेसवर सडकून टीका केली आहे.' हा हायवे १२ वर्ष जुना आहे. राष्ट्रकुल स्पर्धांच्यावेळी हा लोकांना वापरता येईल असं ध्येयसमोर ठेवून या एक्सप्रेसवेची निर्मिती सुरू करण्यात आली होती. पण राष्ट्रकुल स्पर्धांची ज्याप्रकारे दुर्दशा झाली तशीच या रस्त्याची दुर्दशा झाली. काँग्रेसच्या अटकवण्याच्या, लटकवण्याच्या आणि भटकवण्याच्या संस्कृतीमुळे या देशाचं भरपूर नुकसान झालं आहे.' असं विधान नरेंद्र मोदींनी केलं आहे. या प्रकल्पाची सुरुवात झाली तेव्हा त्याची किंमत १२०० कोटी होती आता तिच किंमत तिप्पट झाली आहे असंही मोदी म्हणाले.

## लंकेत स्पिनर्सनी मोडला ५० वर्षांपूर्वीचा इतिहास

**कोलंबो (पीटीआय)-** क्रिकेट जगातत गेल्या काही महिन्यात बरेच विक्रम प्रस्थापित झाले. तर काही विक्रम मोडले गेले. असाच एक विश्वविक्रम श्रीलंकेतील इंग्लंड आणि श्रीलंका यांच्यातील कसोटी सामन्यात झाला. श्रीलंका विरूद्ध इंग्लंड झालेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात दोन्ही संघातील फिरकीपटूंनी एकाच सामन्यात एकूण ३८ बळी घेत वर्ल्ड रेकॉर्ड केले. फिरकीपटूनी केलेली आत्तापर्यंतची ही सर्वोत्तम कामगिरी संबोधली जात आहे. या सामन्यात इंग्लंडच्या जैक लीच, मोईन अली आणि आदिल राशिद यांनी मिळून १९ बळी घेतली आहेत. तर श्रीलंकेच्या फिरकी गोलंदाजांनीही चांगल्या खेळीचे प्रदर्शन करत १९ बळी घेतली आहेत. दोन्ही संघाचे मिळून एकाच सामन्यात फिरकी गोलंदाजांनी ३८ गडी बाद केले. फिरकीपटूंनी एकाच सामन्यात घेण्यात आलेल्या या सर्वाधिक विकेट आहेत. यापूर्वी असे रेकॉर्ड १९६९-७० मध्ये नागपूर येथे ३७ बळी घेऊन करण्यात आले होते. तब्बल ५० वर्षांपूर्वीचा हा विश्वविक्रम श्रीलंकेत मोडला गेला.

## टीव्ही अभिनेत्रीचा नवऱ्यावर लैंगिक अत्याचाराचा आरोप

**मुंबई (नमिता मुणगेकर)-** टीव्ही मालिका 'बडे अच्छे लगते है' मधील अभिनेत्री चाहत खन्नाने आपल्या नवऱ्यावर फरहान मिर्जाच्या विरोधात शारिरीक आणि मानसिक शोषणाचा आरोप लावला आहे. चाहतचं असं



म्हणणं आहे की, फराह माझ्यावर देह व्यापाराचा आरोप लावत असे. चाहतने या अगोदर ऑगस्ट महिन्यातच फरहानपासून वेगळं होण्याची घोषणा केली होती.

चाहतने सांगितलं की, माझं हे फक्त शारिरीक शोषण नव्हतं. तर आर्थिक आणि मानसिक देखील त्रास होता. फरहान कायम माझ्यावर नजर ठेवून असे. मी जेव्हा एका खोलीतून दुसऱ्या खोलीत जात असे तेव्हा पण तो माझ्या मागे मागे फिरायचा.

एवढंच नाही तर त्याने माझ्यावर स्वतःच्या भावाला डेट करत असल्याचे आरोप देखील लावले. घरातील या वातावरणामुळे मला वेड लागायची वेळ आली आहे. फरहान माझ्या कामाच्या ठिकाणी अचानक येतो. शुटिंग दरम्यान को-स्टारला हग केलं किंवा हात पकडला तर हा हंगामा करतो.

## या शहरांमध्ये मिळणार रिलायन्स जिओची फ्री सेवा

**मुंबई (प्रतिनिधी)-** टेलिकॉम क्षेत्रानंतर रिलायंस जिओ आता जिओ गीगाफाइबर FTTH ब्रॉडबँड सर्विस सुरु करत आहे. यासंदर्भातील एका मीडिया रिपोर्टनुसार जिओ कंपनीने त्या शहरांमध्ये सर्वात आधी ही सेवा सुरु करणार आहे ज्या शहरातून सर्वाधिक अर्ज येतील. जर तुम्हाला जिओची ही सेवा हवी असेल तर तुम्हाला Jio.com वर अर्ज करावा लागेल. रिपोर्टनुसार कंपनी सुरुवातीला ३ महिने सर्व ग्राहकांना मोफत सेवा देणार आहे. १०० जीबी डेटा ज्यामध्ये फ्री मिळणार आहे. याबाबत अजून कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही. बंगळुरु, चेन्नई, रांची, पुणे, इंदौर, ठाणे, भोपाळ, लखनऊ, कानपूर, पटना, इलाहाबाद, रायपूर, नागपूर, गाजियाबाद, लुधियाना, मदुरै, नाशिक, फरीदाबाद, कोयंबतूर, गुवाहाटी, आग्रा, मेरठ, राजकोट, श्रीनगर, अमृतसर, चंडीगढ, जोधपूर, कोटा आणि सोलापूर या शहरांमध्ये सेवा सुरु होणार आहे.

## थोडक्यात

### रेल्वे सुरक्षा दल मोबाईल ॲप विकसित करणार

**नवी दिल्ली-** रेल्वे सुरक्षा दलाने (आरपीएफ) मोबाईल ॲप विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे. या अभिनव मोबाईल ॲपमुळे पोलिसांकडून प्रवाशांना हद्दीच्या वादापायी गुन्हा दाखल करण्यात होणारी टाळाटाळ करणे अशक्य होणार असून प्रत्येक गुन्ह्याची



वेगाने नोंद होऊन चोरांच्या मुसक्या आवळणे सोपे होणार आहे. चालत्या गाडीत चोरी झाल्याचे लक्षात येईपर्यंत गाडीने बरेच अंतर कापलेले असते. त्यामुळे गुन्हा नोंदविताना हद्दीचा मुद्दा समोर येतो. त्यामुळे नेमके ठिकाण समजेपर्यंत तक्रार नोंदविण्यातच वेळ वाया जातो. त्यामुळे प्रवाशांनी तत्काळ मोबाईल ॲपवरच गुन्ह्याची तक्रार द्यायची अशा प्रकारचे नवीन ॲप विकसित केले जाणार आहे. अशा ॲपचा प्रस्ताव रेल्वे बोर्डाला पाठविला असल्याची माहिती आरपीएफचे महासंचालक अरुण कुमार यांनी दिली.

### बेस्टचा ७६९ कोटी तुटीचा अर्थसंकल्प मंजूर

**मुंबई -** बेस्ट उपक्रमाचा सन २०१९-२०चा ७६९ कोटी ६८ लाख रुपये तुटीचा अर्थसंकल्प शुक्रवारी रात्री उशिरा बेस्ट समितीमध्ये मंजूर झाला. बेस्टचा अर्थसंकल्प ७२० कोटी ५४ लाख रुपये तुटीचा होता. आता त्यात आणखीन ४९ कोटी १४ लाखांची वाढ झाली.

या अर्थसंकल्पात बेस्टच्या कर्मचाऱ्यांना दिवाळी बोनस देण्याची आणि त्यासाठी एक कोटीची तरतूद केली आहे. राज्य सरकारला पोषण अधिभारापोटी देय असलेली ५५० कोटींची थकबाकी चुकती करण्यासाठी ४० कोटींची तरतूद केली आहे. बेस्टच्या कर्मचाऱ्यांना जाहीर केलेल्या बोनसची पाच हजार ५०० रुपये रक्कम दिवाळी संपल्यानंतरही न दिल्याने काँग्रेस, राष्ट्रवादीच्या सदस्यांनी अर्थसंकल्पाच्या चर्चेवर प्रारंभीच बहिष्कार टाकला होता.

### वाघांच्या सुरक्षेसाठी ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात १ डिसेंबरपासून मोबाइल फोन बंदी

**नागपूर-** ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात सफारीसाठी जाणारे पर्यटक, जिप्सीचालक आणि गाईड्सना १ डिसेंबरपासून मोबाइल फोन नेण्यास बंदी घालण्यात आली आहे. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक एन आर प्रवीण यांनी शुक्रवारी याबाबतचे आदेश काढले आहेत. त्यात वन विभागाने नमूद केले आहे की, व्याघ्र प्रकल्पात पर्यटक सफारी दरम्यान मोबाइल वा स्मार्टफोनच्या वापरामुळे वाघ आणि बिबट्याचे लोकेशन जगजाहीर होते. अनेक पर्यटक वाघांच्या लोकेशनच्या लिंक पाठवतात. त्यामुळे वाघांच्या जीवाला शिकाऱ्यांकडून धोका निर्माण होतो. सफारीचा वेळी पर्यटक आणि जिप्सीचालक एकमेकांशी संपर्क



साधून त्यांना वाघांचे, बिबट्याचा ठावठिकाणा कळवतात. परिणामी इतर जिप्सीचालक त्या ठिकाणी वेगाने पोहोचण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे अपघातांची शक्यता निर्माण होते. अनेक पर्यटक सेल्फीचे प्रयत्न करतात. त्यामुळे वाघ-बिबट्यांच्या अधिवासावर त्याचे विपरीत परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे सफारी दरम्यान मोबाइल बंदीचा निर्णय घेण्यात आला आहे. १ डिसेंबरपासून या निर्णयाची अंमलबजावणी होत आहे. यात पर्यटक किंवा जिप्सीचालक मोबाइल फोन बाळगून आढळल्यास कारवाई होणार असल्याचे वन विभागाने स्पष्ट केले आहे.

# काँग्रेसने गांधी घराण्याबाहेरचे १५ अध्यक्ष दिले: काँग्रेसचा मोदींवर पलटवार

**नवी दिल्ली (विशाल कारंडे)-** पंडित जवाहरलाल नेहरूंमुळे चहावाला पंतप्रधान झाल्याचे सांगणाऱ्या काँग्रेसने गांधी घराण्याबाहेरचा एकतरी अध्यक्ष करून दाखवावाच, असे आव्हान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी काँग्रेसला दिले होते. त्यावर काँग्रेसने पलटवार केला आहे. पक्षाने आतापर्यंत नेहरू- गांधी घराण्याबाहेरचे १५ अध्यक्ष दिले आहेत, असे उत्तर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पी. चिदंबरम यांनी दिले आहे. चिदंबरम यांनी या अध्यक्षांची नावेच ट्विट केली आहेत.

चिदंबरम यांनी एकापाठोपाठ एक असे तीन ट्विट करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या टीकेला उत्तर दिले. त्यानंतर त्यांनी राफेल डील, बेरोजगारी आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्येवर उत्तर देण्याचे आव्हान मोदी यांना दिले आहे. 'मोदींना माहीत असावे म्हणून गांधी घराण्याशी संबंधित नसलेल्या काँग्रेसच्या अध्यक्षांची नावे देत आहे. १९४७ नंतर आचार्य कृपलानी, पट्टाभी सीतारमैय्या, पुरुषोत्तमदास टंडन, यू. एन. धेबर, संजीव रेड्डी, संजीवैय्या, कामराज, निजलिंगप्पा, सी. सुब्रमण्यम, जगजीवन राम, शंकरदयाळ शर्मा, डी. के. बरुआ, ब्रम्हानंद रेड्डी, पी. व्ही. नरसिंहराव आणि सीताराम केसरी हे काँग्रेसचे अध्यक्ष झाले आहेत,' असे सांगतानाच 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लाल बहादूर शास्त्री, के. कामराज आणि मनमोहन सिंग यांच्यासारख्या कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या आणि देशासाठी मोठे योगदान देणाऱ्या नेत्यांचाही आम्हाला अभिमान आहे,' असे वक्तव्य चिदंबरम यांनी केले आहे. 'काँग्रेसच्या अध्यक्षपदी कुणाला नियुक्त करण्यात आले याची चिंता व्यक्त केल्याबद्दल मोदींचे आभार.



यावरून पंतप्रधान मोदींकडे या विषयावर चर्चा करण्यासाठी बराच वेळ असल्याचे दिसून येते असेही पी. चिदंबरम यांनी म्हटले आहे. आंध्र प्रदेश सरकारने सीबीआय संदर्भात जारी केलेला आदेश गंभीर असून मोदी सरकारने देशातील सर्वोच्च तपास यंत्रणा सीबीआयला 'प्रायव्हेट आर्मी' बनवल्याची गंभीर आरोप काँग्रेस नेते पवन खेडा यांनी केला आहे. दरम्यान, पश्चिम बंगाल सरकारने सीबीआयला राज्यात छापेमारीसाठी तसेच तपासासाठी देण्यात आलेली सामान्य परवानगी शुक्रवारी मागे घेतली. गेल्या साडेचार वर्षांत देशातील संस्थांची आपण काय परिस्थिती करुन ठेवली आहे, याचा मोदी सरकारने अंतर्मुख होऊन विचार केला पाहिजे. जर यात सुधारणा झाली नाही, तर देशासाठी हा मोठा धोका असल्याचेही खेडा म्हणाले.

# २० डिसेंबरला निवासी डॉक्टर्सकडून रास्ता रोको आंदोलन

**मुंबई (हर्षद परब)-** आपल्या प्रलंबित मागण्यांबाबत सरकार दरबारी सकारात्मक विचार होत नसल्याचा आरोप करत राज्यातील सरकारी महाविद्यालयातील मार्ड या निवासी डॉक्टरांच्या संघटनेने २० डिसेंबरला राज्यभरात रास्ता रोको आंदोलन पुकारले आहे. याबाबत नाराजी दर्शवण्यासाठी मार्डने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून रास्ता रोकोबाबत पूर्वकल्पना दिली आहे.

औरंगाबाद आणि जेजे रुग्णालयातील निवासी डॉक्टरांवर झालेला हल्ला, रुग्णांच्या नातेवाइकांसाठी पासची सोय, डॉक्टरांवर हल्ला झाल्यास तत्काळ माहिती मिळण्यासाठी सरकारी रुग्णालयात अलार्म सिस्टीम, उच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे निवासी डॉक्टरांविरोधातील हल्ल्यांविरोधातील चौकशीसाठी उच्चस्तरीय समितीची स्थापना



करणे याबाबत अद्यापही वैद्यकीय शिक्षण व संशोधन (डीएमईआर) ने निर्णय घेतलेला नाही. महिला निवासी डॉक्टरांची प्रसूती रजा, क्षयरोगाच्या उपचारांसाठी रजा, स्टायपनमध्ये वाढ याबाबत अद्यापही सक्षम निर्णय झालेला नसल्याची तक्रारही मार्डने मुख्यमंत्र्यांना केली आहे.

वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या पदवीधर विद्यार्थ्यांना अद्यापही बंधपात्रता प्रक्रिया अद्यापही ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध झालेली नाही. या प्रक्रियेतील त्रुटीही मार्डने मुख्यमंत्र्यांसमोर मांडल्या आहेत. वैद्यकीय रुग्णालयांतील औषधे व साहित्यांच्या तुटवड्यावर काम करण्यासाठी ऑडिट समितीची स्थापना करणे, सरकारी रुग्णालयांत चोवीस तास निवासी डॉक्टरांसाठी उपाहारगृहांची सोय करणे आदी मागण्याही मार्डने केल्या आहेत.

## वर्दीतला नराधम, पोलीस उपनिरीक्षकाने केला महिला कॉन्स्टेबलवर बलात्कार!

**नवी मुंबई (धनश्री सट्टा)-** मिटू मोहिमेत अनेक सेलेब्रिटी आणि राजकारणी वादात सापडले. आता तर ज्यांनी कायद्याचं रक्षण केलं पाहिजे त्याच खाकीतील माणसाने सैतानी कृत्य केले आहे. एका महिला पोलीस कॉन्स्टेबलने पोलीस उपनिरीक्षकावर लैंगिक अत्याचाराचे आरोप केले आहे. ही घटना वाशी पोलीस स्टेशनमध्ये असताना घडली. पीडित महिला पोलीस कॉन्स्टेबल आहे. तर आरोपी अमित शेलार हा तेव्हा नाईकपदावर काम करत होता. मागील वर्षी २०१७ मध्ये आरोपी अमित शेलारने पीडित महिलेला ज्यूसमधून गुंगीचे औषध दिले. अर्धवट शुद्धीवर असताना अत्याचार केला. हा प्रकार एवढ्यावरच थांबला नाही तर शेलार यांने या घटनेचं मोबाईलमध्ये चित्रिकरणही केलं. त्यानंतर हे हा व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी दिली. व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देऊन



२०१७ ते १३ नोव्हेंबर २०१८ या कालावधीत सीबीडी, पनवेल तसेच कामोठे या ठिकाणी वाहनात नेऊन अत्याचार केला. पीडित महिलेनं याला विरोध केला असता शिवीगाळ करून मारहाण केली.

## मर्सिडीझने बिहारहून मुंबईला यायचे..दिवसभर टेहळणी करून रात्री करायचे घरफोडी; थांबायचे आलिशान हॉटेलात

**पुणे (अभिजीत येरल्लु) -** मर्सिडीझ कारने बिहार ते मुंबई प्रवास करून पंधरा दिवसांसाठी महागडे हॉटेल बुक करायचे. नंतर दिवसभर मुंबई, नवी मुंबई आणि ठाणे शहरात बंद असलेले बंगले आणि आलिशान फ्लॅटची टेहळणी करायची. त्यानंतर रात्री ते घरफोडी करायचे. काही दिवसांपूर्वी लोणावळा परिसरातील रायवूड येथील कटी पतंग या बंगल्यात घरफोडी झाली होती. या प्रकरणाचा छडा लावताना बिहारच्या दोन आरोपींना पोलिसांनी अटक केली. त्यांनी दिल्लीसह मुंबईत घरफोड्या केल्याची कबुली दिली. इरफान अख्तर शेख (२९, रा. जोगिया, ता. गाडा, जि. सीतामडी, बिहार) आणि मारुफ मतिउर अली (२५, रा. बिहार) अशी या प्रकरणी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. लोणावळ्यात १ नोव्हेंबर रोजी दोघांनी कटी पतंग बंगल्याच्या मुख्य दरवाजाची काच फोडून बंगल्यात प्रवेश केला. त्यानंतर रोख रकमेसह महागडा मॉंट ब्लॅक कंपनीचा पेन असा एकूण सहा लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची कबुली दिली. याप्रकरणी आरोपींविरोधात लोणावळा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा



पोलिस तपास करत असताना सीसीटीव्ही फुटेजमध्ये आरोपींचा चेहरा व मर्सिडीझ कार निदर्शनास आली. त्याआधारे पोलिसांनी सापळा रचून मर्सिडीझ कार (एचआर २६ बीएफ ७८६) मध्ये बसून संबंधित दोन आरोपी लोणावळ्यातील टायगर पॉइंट येथे आले असता त्यांना ताब्यात घेऊन त्यांची झडती घेण्यात आली. त्या वेळी त्यांच्याकडे घरफोडीसाठी वापरण्यात येणारे साहित्य स्क्रू ड्रायव्हर, कटावणी, कटर तसेच रोख नऊ हजार रुपये सापडले.